19 NOV 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक भान असणाऱ्या विद्यापीठांचे भवितव्य उज्ज्वल

## डॉ. काणे : शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापन दिन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'विद्यापीठांचे सामाजिक भान जितके अधिक तितके त्यांचे भवितव्य अधिक उज्ज्वल असते,' असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. काणे म्हणाले, "मानवी जीवनात जन्मानंतर मृत्यू अटळ आहे. या दरम्यान आपण काय करावयाचे, कुठल्या पद्धतीने करावयाचे, याची पसंती ठरविता येते. संस्था मात्र अमर्त्य असते. संस्थेचे वय जितके वाढेल, तितके तिचे चिरतारुण्य, सशक्तता आणि चैतन्य वृद्धिंगत होते. वाढत्या वयागणिक तिची भरभराट होते. विद्यापीठांचे स्वरूपही तसेच व्यापक आहे. ते नदीप्रमाणे प्रवाही आहे. शिक्षक आणि विद्यार्थी हे तिचे दोन तीर आहेत आणि प्रशासन हा या दोहोंना जोडणारा पूल आहे."



डॉ. एस. पी. काणे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, "गतवर्षी घोषित केल्याप्रमाणे विद्यापीठ मोबाईल पेमेंट गेटवे व एम्प्लॉईज कॉर्नर या सुविधा कार्यान्वित झाल्या. विद्यापीठाने कॅश विभागात पॉईंट ऑफ सेल अर्थात पी.ओ.एस. मशिन्स बसविली.

पान २ वर »

# सामाजिक भान असणाऱ्या विद्यापीठांचे भवितव्य उज्ज्वल

» पान १ वरून

यंदा दीक्षान्त शुल्क ऑनलाइन भरणा करण्याची प्रणाली शंभर टक्के यशस्वी झाली. कामकाज पेपरलेस करण्याचे काम प्रगतिपथावर आहे." कार्यक्रमात विद्यापीठ, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी, पारितोषिके देऊन गौरवले.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील व संज्योत माने यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. विद्यापीठ प्रांगणात सकाळी कुलगुरू डॉ. काणे यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

**पारितोषिक विजेते शिक्षक :**

प्रा. डॉ. प्रकाश राऊत (पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख), प्रा. डॉ. राजश्री साळुंखे (रसायनशास्त्र अधिविभाग). गुणवंत शिक्षक : डॉ. सुरेश पाटील (सहयोगी प्राध्यापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. रमेश अडसूळ (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), विद्यापीठातील गुणवंत सेवक : डॉ. मिलिंद जोशी (समन्वयक, इंटरनेट युनिट), विश्वास शिरोळे (अधीक्षक, परीक्षा प्रमाद), रत्नमाला साळुंखे (सहा. अधीक्षक, भांडार विभाग), आनंदा पाटील (हेड-माळी, उद्यान विभाग). महाविद्यालयीन गुणवंत सेवक : रवींद्र हिडदुगी (कनिष्ठ लिपिक, तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नेसरी). तसेच सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात बीएस्सीचा विद्यार्थी प्रशांत पांडेकर याच्या दृष्टी : दि व्हीजन या लघुपटाला स्वच्छ भारत अभियानांतर्गत आयोजित राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्याचाही गौरव केला.

19 NOV 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक भानामुळेच विद्यापीठांचे भवितव्य उज्ज्वल

## – डॉ. एस. पी. काणे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** विद्यापीठांचे सामाजिक भान जितके अधिक तितके त्यांचे भवितव्य अधिक उज्ज्वल असते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

कुलगुरू डॉ. काणे म्हणाले, आजच्या शैक्षणिक भोवतालामध्ये गुरू-शिष्याचे नाते हे ग्राहक आणि सेवा-पुरवठादार अशा पद्धतीचे बनत चालले आहे, ही बाब चिंताजनक आहे. त्याचवेळी आजची पिढी अत्यंत स्मार्ट व ज्ञानपिपासू आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांत समतोल साधण्याची जबाबदारी विद्यापीठांवर आहे. आपल्या हातून चांगले आणि समाजोपयोगी काम व्हावे, ही भावना आणि मदतीला धावून जाण्याची वृत्ती यातूनच प्रगतीची दिशा अवलंबून असते.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, वर्षभरात मला या राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच मुंबई विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांचप्रमाणे जगप्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठास 'व्हिज़िटिंग स्कॉलर' म्हणून भेट देण्याची संधी लाभली. गेल्याच आठवड्यात बेल्जियमच्या राणी मॅथिल्डा यांच्यासमवेत नवी दिल्ली येथे झालेल्या 'अॅकॅडेमिक राऊंड टेबल' परिषदेत सहभागी होणारा देशातील एकमेव कुलगुरू ठरलो. या सर्व संधी केवळ शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणूनच मला प्राप्त झाल्या. मोबाईल अॅप, पेमेंट गेटवे व एम्प्लॉईज कॉर्नर या सुविधा कार्यान्वित झाल्या आहेत. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवामहोत्सव तथा 'शिवोत्सव-२०१७' आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'आव्हान-२०१७' या उपक्रमांसाठीची नोंदणी, आवश्यक माहितीची देवाण-घेवाण आणि प्रमाणपत्र उपलब्धता आदी बाबीही ऑनलाईन अॅन्ड्रॉईड अॅप्लिकेशनच्या माध्यमातून यशस्वीपणे करण्यात आल्या. विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या दर्जेदार ग्रंथांना असलेली अभ्यासकांतील मागणी लक्षात घेता १७ जून रोजी विद्यापीठाच्या 'ऑनलाइन बुक स्टोअर'चे उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे जगाच्या पाठीवरून कोठूनही विद्यापीठाचे ग्रंथ खरेदी करणे शक्य होणार आहे. केवळ मार्च-एप्रिलच्या सत्रातील परीक्षांबद्दल सांगायचे झाले, तर एकूण ६२१ परीक्षांपैकी ३१२ परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत, १८९ निकाल ४५ दिवसांच्या आत लागले. परीक्षांचा कालावधीही ५६ दिवसांवरून ४२ दिवस इतका कमी केल्याने वेळ, श्रम आणि आर्थिक बचतही साध्य झाली.

याप्रसंगी गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांना पुरस्कार, वर्षभरात 'नॅक'चे 'अ+' व 'अ' मानांकन मिळविणाऱ्या शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील २० संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

सातारा येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात बी.एस्सी.चा विद्यार्थी प्रशांत पांडेकर याच्या 'दृष्टी : दि व्हिजन' या लघुपटाला 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. विविध पारितोषिक विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे : विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : डॉ. प्रकाश राऊत, डॉ. राजश्री साळुंखे. महाविद्यालयीन गुणवंत शिक्षक : डॉ. सुरेश पाटील, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. रमेश अडसूळ, विद्यापीठातील गुणवंत सेवक : डॉ. मिलिंद जोशी, विश्वास शिरोळे, रत्नमाला साळुंखे, आनंदा पाटील. महाविद्यालयीन गुणवंत सेवक : रवींद्र हिडदुग्गी. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व संज्योत माने यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात प्रकाश राऊत यांना पुरस्कार प्रदान करताना नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर.** (छाया : एस. अली)

### शिवरायांना अभिवादन

विद्यापीठ प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे कुटुंबीय, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

19 NOV 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी सामाजिक भान जपावे

**कुलगुरू डॉ. काणे यांचे प्रतिपाद**

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'आजची पिढी अत्यंत स्मार्ट आणि ज्ञानपिपासू आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. बदलत्या परिस्थितीत शिक्षक आणि विद्यार्थ्यांत समतोल साधण्याची जबाबदारी विद्यापीठांवर आहे. विद्यापीठांचे सामाजिक भान जितके अधिक तितके त्यांचे भवितव्य अधिक उज्ज्वल असते,' प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस.पी. काणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापनदिन शनिवारी उत्साहात साजरा झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यापीठ व महाविद्यायांतील गुणवंत प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित केले. कार्यक्रम विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रे व इतर शैक्षणिक कागदपत्रांचे कम्प्युटरायझेशन व हाताळण्याचा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर सी.डी.एस.एल. संस्थेने हाती घेतला आहे. विद्यापीठाने सामंजस्य करार केला असून, प्राथमिक टप्प्यात ५२ हजार विद्यार्थ्यांचा डेटा त्यांच्याकडे सुपूर्द केला आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभासाठी विद्यार्थ्यांना पत्राऐवजी एसएमएस तसेच ऑनलाइन सूचना देण्यात आल्या. त्यामुळे सुमारे ५० हजार पत्रांची छपाई तसेच पोस्टेज अशी सुमारे १२ लाख रुपये खर्चाची बचत झाली.'

सातारा येथील लालबहादूर शास्त्री कॉलेजमधील बी.एस्सी.चा विद्यार्थी प्रशांत पांडेकर याच्या 'दृष्टी : दि व्हिजन' या लघुपटाला 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत आयोजित राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल विशेष गौरव झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती नंदिनी पाटील व संज्योत माने यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.




**शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. पी. डी. राऊत. सोबत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

## पुरस्कारप्राप्त शिक्षक व कर्मचारी

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. प्रकाश दत्तात्रय राऊत (पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख), प्रा. डॉ. राजश्री संदीप साळुंखे (रसायनशास्त्र अधिविभाग). महाविद्यालयीन गुणवंत शिक्षक : डॉ. सुरेश सोपानराव पाटील (शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. रमेश कोंडिबा अडसूळ (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), विद्यापीठातील गुणवंत सेवक : डॉ. मिलिंद जगन्नाथ जोशी (समन्वयक, इंटरनेट युनिट), विश्वास सुबराव शिरोळे (अधीक्षक, परीक्षा प्रमाद), रत्नमाला दत्तात्रय साळुंखे (सहायक अधीक्षक, भांडार विभाग), आनंदा महादेव पाटील (हेड- माळी, उद्यान विभाग). महाविद्यालयीन गुणवंत सेवक : रवींद्र श्रीशैलाप्पा हिडदुग्गी (कनिष्ठ लिपिक, तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नेसरी).

19 NOV 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या ५५व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाच्या प्रांगणात शनिवारी सकाळी ध्वजवंदन करून मानवंदना देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी समारंभाचे प्रमुख पाहुणे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे व विद्यापीठातील अधिकारी उपस्थित होते.

**एस. पी. काणे :** शिवाजी विद्यापीठाचा ५५वा वर्धापनदिन उत्साहात

# शिक्षक, विद्यार्थ्यांत समतोल साधण्याची जबाबदारी विद्यापीठांवर

**कोल्हापूर :** आजच्या शैक्षणिक क्षेत्रात गुरू-शिष्याचे नाते हे ग्राहक आणि सेवा-पुरवठादार अशा पद्धतीचे बनत चालले आहे, ही बाब चिंताजनक आहे. त्याचवेळी आजची पिढी अत्यंत स्मार्ट व ज्ञानपिपासू आहे. नवमाध्यमांमुळे माहितीचे भांडार त्यांच्यासाठी खुले झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. या बदलत्या परिस्थितीत शिक्षक आणि विद्यार्थ्यांत समतोल साधण्याची जबाबदारी विद्यापीठांवर आहे, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापन दिन समारंभ शनिवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाने रोखविरहित आर्थिक व्यवहारांना चालना देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला बळकटी देण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाने कॅश विभागात 'पॉइंट ऑफ सेल' अर्थात पी. ओ. एस. मशीन्स बसविली आहेत. 'नॅक'चे मानांकन मिळविणाऱ्या विद्यापीठ परिक्षेत्रातील २० संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

## यांचा झाला सत्कार...

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. प्रकाश दत्तात्रय राऊत (पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख), प्रा. डॉ. राजश्री संदीप साळुंखे (रसायनशास्त्र अधिविभाग), महाविद्यालयीन गुणवंत शिक्षक : डॉ. सुरेश सोपानराव पाटील (सहयोगी प्राध्यापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. रमेश कोंडिबा अडसूळ (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), विद्यापीठातील गुणवंत सेवक : डॉ. मिलिंद जगन्नाथ जोशी (समन्वयक, इंटरनेट युनिट), विश्वास सुबराव शिरोळे (अधीक्षक, परीक्षा प्रमाद), रत्नमाला दत्तात्रय साळुंखे (सहा. अधीक्षक, भांडार विभाग), आनंदा महादेव पाटील (हेड - माळी, उद्यान विभाग), महाविद्यालयीन गुणवंत सेवक : रवींद्र श्रीशैलाप्पा हिडदुग्गी (कनिष्ठ लिपिक, तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नेसरी). लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात विद्यार्थी प्रशांत पांडेकर याच्या 'दृष्टी : दि व्हिजन' या लघुपटाला 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत आयोजित राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्याचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.

19 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांचे सामाजिक भान अधिकाधिक हवे

## कुलगुरू डॉ. काणे; शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा वर्धापनदिन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात शनिवारी गुणवंतांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. एस. पी. काणे. डावीकडून डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

**(छाया : पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठांचे सामाजिक भान जितके अधिक तितके त्यांचे भवितव्य अधिक उज्ज्वल असते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. पी. काणे यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात डॉ. काणे बोलत होते. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. विद्यापीठाचा वर्धापनदिन शनिवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

### कुलगुरू डॉ. शिंदे यांचे काम कौतुकास्पद

*कुलगुरू डॉ. काणे म्हणाले, राज्याच्या शैक्षणिक क्षेत्राला दिशा देण्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे करत असलेले काम कौतुकास्पद आहे. ते आपल्या शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्यांचा लाभ राज्यांतील इतर विद्यापीठांना करून देत आहेत. त्यांना ही संधी मिळते कारण त्यांच्यामागे शिवाजी विद्यापीठाची विश्वासार्हता आहे.*

कुलगुरू डॉ. काणे म्हणाले, विद्यापीठांचे स्वरूप व्यापक आहे. ते नदीप्रमाणे प्रवाही आहे. शिक्षक आणि विद्यार्थी हे तिचे दोन तीर आहेत आणि प्रशासन हा या दोहोंना जोडणारा पूल आहे. यातील एकही बाजू कमकुवत झाली की, प्रवाहात बाधा निर्माण होते. हा प्रवाह अखंडित ठेवण्याचे काम विद्यापीठांचे सामाजिक भान आणि बांधिलकी करीत असते. शिवाजी विद्यापीठात यापूर्वी २०११ साली मी आलो होतो. हा परिसर पाहून मी या संस्थेचा चाहता झालो असल्याची प्रशंसाही त्यांनी केली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, वर्षभरात मला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तसेच मुंबई विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. परीक्षांचा कालावधी ५६ दिवसांवरून ४२ दिवस इतका कमी झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

'नॅक'चे 'अ प्लस' व 'अ' मानांकन मिळविणाऱ्या शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील २० संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील गुणवत्तांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2017
पुढारी

# उद्या मतमोजणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळ निवडणुकीची मतमोजणी सोमवारी (दि. २०) सकाळी आठ वाजल्यापासून सुरू होणार आहे. पदवीधर वगळता बहुतांश गटांत नव्वद टक्क्यांच्या आसपास मतदान झाले आहे. त्यामुळे मतदानात कमालीची चुरस दिसून आली. आता निकालाकडे शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे. विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) या दोन्हींकडून विजयाचे दावे केले जात आहेत.

विद्यापीठ निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि.१७) चुरशीने आणि ईर्षेने मतदान झाले. ७२ जागांसाठी १५६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळे आता मतमोजणीत कोणत्या विभागात कोणत्या गटाचा उमेदवार विजयी होईल याबद्दल शैक्षणिक क्षेत्रात आडाखे बांधले जात आहेत. कृती समितीला सुटाने पाठिंबा दिला आहे. शिक्षक गट, अभ्यासमंडळे, विद्या परिषद या शाखांमध्ये विकास आघाडी आणि सुटा असा सामना आहे.

मतमोजणी विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्रमांक२ या इमारतीत होणार आहे. अभ्यास मंडळे, विद्यापीठ शिक्षक या शाखांचे निकाल दुपारी लागणे अपेक्षीत आहे. मात्र, सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषद शाखांचे निकाल मध्यरात्रीनंतर लागतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे. कारण पसंतीक्रमांकानुसार मतदान पद्धत आहे.

19 NOV 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मते बाद होण्याचे प्रमाण वाढणार?

## पसंती क्रमांक लिहिण्यात चुका; पदवीधरमध्ये प्रमाण जास्त राहणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत मतपत्रिका बाद होण्याचे प्रमाण वाढेल, अशी शक्यता जाणकारांकडून व्यक्त होत आहे. यामध्ये पदवीधर गटांत मते बाद होण्याची शक्यता सर्वाधिक होऊ शकते. कारण पसंती क्रमांकाने मत देताना असणारे नियम काटेकोर पाळावे लागतात. यामध्ये त्रुटी दिसल्यास ते मत बाद धरले जाते. याचे दुसरे कारण असे की, मतदान करण्यासाठी आलेल्या अनेकांना मतदान कशा पद्धतीने द्यायचे हे लवकर समजून आले नसल्याचे दिसून आले.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या

**विद्यापीठ निवडणूक**

निवडणुकीसाठी चुरशीने नुकतेच मतदान झाले. आता सोमवारी (दि.२०) मतमोजणी होत आहे. पसंती क्रमांक पद्धतीने मतदान झाले. पहिल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोर १ पसंती क्रमांक टाकून इतर उमेदवारांसमोर २, ३, ४ असे जितके उमेदवार असतील तितकी संख्या वाढत्या पसंती क्रमांकानुसार लिहिली तरी चालते अशी ही पद्धत आहे, पण प्रत्यक्षात मतदान करताना अनेकांचा पसंती क्रमांक लिहिताना गोंधळ झाल्याची चर्चा मतदान केंद्राबाहेर दिसून आली.

### मतदान का बाद होऊ शकेल

*सोलापूर विद्यापीठात नुकतीच निवडणूक प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत नोंदणीकृत पदवीधर गटांसाठी ४३०० मतदान झाले. यापैकी तब्बल एक हजार मते बाद झाली. शिक्षक गटांतसुद्धा सरासरी पाचशेंवर मतदान बाद झाले. पसंतीक्रमांक कंसात टाकणे, एकच पसंतीक्रमांक दोनतीनवेळा टाकणे, खाडाखोड करणे तसेच कोऱ्या मतपत्रिका अशांमुळे हे मतदान बाद झाले आहे. शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेत मतदारांची संख्या मोठी असल्याने बाद होण्याचे प्रमाण वाढू शकते, असा निवडणूक तज्ज्ञांचा अंदाज आहे.*

**पदवीधर गटांतील मतदारांचे प्रशिक्षण**

पदवीधरांचे मतदान नोंदवण्यासाठी सर्वच गटांनी परिश्रम घेतल्याचे दिसले. परंतु, पदवीधरांनी मतदान कशा पद्धतीने करावे याबाबतीत मात्र बहुतेकांनी मार्गदर्शन केल्याचे दिसून आले नाही. दुसऱ्या बाजूला अनेक पदवीधर मतदारांनीही मतदान प्रक्रिया बारकाईने समजून घेतली नसल्याचेही चित्र होते. कारण अनेक तरुण मतदान कसे करू, असे मतदार केंद्राबाहेर विचारत होते. या गोष्टीचा फटका विजयाचे दावे करणाऱ्यांनाही बसण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2017
Times of India


# Shivaji University rings in 55th Foundation Day

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) celebrated its 55th foundation day on Saturday in presence of vice-chancellor Devanand Shinde.

S P Kane, vice-chancellor of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) and other authorities were also present on the occasion.

During the ceremony, ideal teachers from the university's department as well as affiliated colleges were felicitated. Administrative officers excelling in their duties and the wards of the teaching and non-teaching staff of the university that have excelled in academics were felicitated as well.



In his speech, Kane said the universities with a social relevance always have a bright future. He said that just like the growth of a human being in different phases enriches him/her, universities also follow the same path.

Devanand Shinde in his speech said that he was chosen for the acting vice-chancellorship of the Savitribai Phule Pune University and Mumbai University, due to his achievements at SUK only.

"I had been to the Oxford University as a visiting scholar and have been getting different experiences, thanks to SUK," he said.